दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २१६ वा मंगळवार दि.३० जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# कुणबी दाखला असलेल्यांचाच 'ओबीसी'मध्ये समावेश



नागपूर : महाराष्ट्रात गेल्या अनेक महिन्यांपासून मराठा समाज आरक्षणासाठी अधिक तीव्रतेने आंदोलन करत होता. अखेर २७ जानेवारी रोजी राज्य सरकारने यावर तोडगा काढला. राज्यातल्या शिंदे-फडणवीस-पवार सरकारने बातचीत करून मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वातील मराठा मोर्चा मुंबईच्या वेशीवर रोखला. तसेच मराठा आंदोलकांच्या सर्व प्रमुख मागण्या मान्य केल्या.मराठा समाजाचा कुणबी दाखल्यांसह (नोंदी असलेल्या) ओबीसी आरक्षणात समावेश केला जाणार आहे. तसेच त्यांच्या सगेसोय-यांनाही शपथपत्रावर ओबीसीत सामील करून घेतलं जाणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे मराठा आंदोलक माघारी फिरले असले तरी ओबीसी नेते मात्र संताप व्यक्त करत आहेत. राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनीदेखील या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे.छगन भुजबळ यांनी राज्य सरकारविरोधात भूमिका घेतली आहे. तसेच पक्षातून बाहेर पडण्याबाबत वक्तव्य केलं आहे. यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. देवेंद्र फडणवीस यांनी काही वेळापूर्वी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, मला राज्याला स्पष्टपणे सांगायचं आहे की, भारतीय जनता पार्टी या सरकारमध्ये आहे तोपर्यंत काहीही झालं तरी आम्ही ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. आम्हाला ओबीसींना संरक्षण देता येत नाही असं वाटलं तर मी स्वत: माझ्या वरिष्ठांशी बोलेन.

# राष्ट्रपती मुइज्जूंनी पंतप्रधान मोदींची माफी मागावी





माले : भारताशी पंगा घेणे मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुइज्जू यांना चागलेच महागात पडताना दिसत आहे. मालदीवचा सर्वात मोठा विरोधी पक्ष एमडीपी संसदेमध्ये मुइज्जूंविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याची शक्यता आहे. यानंतर त्यांच्या विरोधात महाभियोगाची प्रक्रियाही सुरू होईल. महत्त्वाचे म्हणजे, माजी राष्ट्रपती सोलिह यांचा पक्ष असलेल्या एमडीपीकला संसदेत बहुमत आहे. अशा परिस्थितीत मोहम्मद मुइज्जू यांच्या खुर्चीवर संकट येताना दिसत आहे.तसेच, चीन दौ-यावरून परतल्यानंतर मुइज्जू यांना भारतावर अप्रत्यक्षपणे शाब्दिक हल्ला केल्याबद्दल नवी दिल्लीची माफी मागावी लागेल असे मालदीवचे बिझनेस टायकून आणि जूमहूरे पार्टीचे नेते कासिम इब्राहिम यांनी म्हटले आहे. चीनवरून परतल्यानंतर, मालदीव कुण्या खास देशाचा बॅकयार्ड नाही आणि कुठल्याही देशाला त्याला धमकावू दिले जाणार नाही, असे मुइज्जू यांनी म्हटले होते. त्यांच्या या वक्तव्याने खळबळ उडाली होती आणि मालदीवच्या विरोधी पक्षातील नेत्यांनी जोरदार हल्ला केला होता. मालदीवचे खासदार कासिम म्हणाले, मी मालदीवचे राष्ट्रपती मुइज्जू यांना त्यांच्या विधानाबद्दल भारत सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची औपचारिक माफी मागावी, अशी विनंती करेन. कासिम म्हणाले, मुइज्जू यांनी भावनेच्या भरात हे भारत विरोधी भाष्य केले आहे.कासिम म्हणाले, माजी राष्ट्रपती अब्दुल्ला यामीन यांनी मालदीवमधील लोक आणि भारतातील लोकांमध्ये अशांतता अथवा मतभेद निर्माण व्हावेत, यासाठी इंडिया आऊट मोहीम सुरू केली होती. माजी राष्ट्रपती सोलिह यांनी त्यावर कोणतीही कारवाई केली नाही आणि त्यांना इंडिया आऊट मोहीम चालवू दिली. मात्र, हे कँपेन वाढल्यानंतर त्यावर बंदी घालण्यात आली. तसेच, आपण मालदीवचे भारतावरील अवलंबित्व कमी करू. भारतातील लो क्वालिटीच्या औषधांऐवजी युरोप आणि अमेरिकेहून मागवू असेही मुइज्जू यांनी म्हटले होते.

# नार्वेकरांच्या नियुक्तीला विरोध



मुंबई : प्रतिनिधी देशाच्या पक्षांतर्गत बंदी कायदा चिकित्सा समितीच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया देत संताप व्यक्त केला आहे. नार्वेकरांची नियुक्ती देशातील लोकशाही संपवण्याच्या दिशेने टाकलेले पाहिले पाऊल मानायचे का? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. तसेच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर हे आता पक्षांतर बंदी कायद्याची चिकित्सा करुन आढावा घेणार आहेत.विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वे कर यांचे नाव मागील वर्षभरापासून चर्चेत आहे. कधी आमदार अपात्रतेच्या प्रकरणाची सुनावणी तर कधी त्यांनी त्यावर दिलेल्या निकालामुळे त्यांचे नाव कायमच चर्चेत राहिले. त्यातच आता लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी महाराष्ट्र विधानभवनात झालेल्या ८४ व्या अखिल भारतीय पीठासन अधिकारी आणि सचिव परिषदेमध्ये परिशिष्ठाची चिकित्सा समितीची रविवारी घोषणा करत राहुल नार्वेकरांची अध्यक्षपदी नियुक्ती जाहीर केली आहे.यावर माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी म्हटले की, राहुल नार्वेकर यांची ही नियुक्ती म्हणजे सर्वोच्च न्यायालयावर दडपण आणण्याचा प्रयत्नच समजावा लागेल. शिवाय ही देशातील लोकशाही संपवण्याच्या दिशने टाकलेले पाऊल मानायाचे का असा सवालही उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.'आम्ही सर्वोच्च न्यायालयाहून मोठे आहोत, आम्ही म्हणू तेच संविधान आणि म्हणू तोच कायदा यापुढे देशात असेल असे म्हणणारे कोणीही असले तरी त्याला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाची आणि लोकशाहीची ताकद दाखवावीच लागेल. अन्यथा देशात लोकशाहीची हत्या होऊन बेबंदशाही येईल', असे उद्धव ठाकरे म्हणाले.महाराष्ट्रात नुकताच परिशिष्ट दहाच्या चिंधड्या उडवून जो उरफाटा निर्णय नार्वेकरांनी दिला त्याचे वस्त्रहरण आम्ही जनतेच्या न्यायालयात तर केलेच, पण त्या विरोधात आम्ही सर्वोच्च न्यायालयातही गेलो आहोत. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात असताना ही नेमणूक करणे म्हणजे सर्वोच्च न्यायालयावर दडपण आणण्याचा प्रयत्न समजावा लागेल. आम्ही सर्वोच्च न्यायालयाहून मोठे आहोत, आम्ही म्हणू तेच संविधान आणि म्हणू तोच कायदा यापुढे देशात असेल. असे म्हणणारे कोणीही असले तरी त्याला डॉक्टर बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाची आणि लोकशाहीची ताकद दाखवावीच लागेल.अन्यथा देशात लोकशाहीची हत्या होऊन बेबंदशाही येईल, असेही ठाकरे म्हणालेत.जितेंद्र आव्हाड यांची टीका 'पक्षांतरबंदी कायद्यासंदर्भात भारतीय राज्यघटनेच्या १० व्या परिशिष्टाच्या संशोधन समितीचे अध्यक्ष म्हणून राहूल नार्वेकर यांची निवड होणं यापेक्षा मोठी शोकांतिका काय असू शकते?', असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. स्वत:च्या राजकीय स्वार्थासाठी तत्त्व आणि नैतिकतेला मूठमाती देऊन जी व्यक्ती सर्व पक्षांसोबत घरोबा करून आलेली आहे, त्याला यापदी नेमणे म्हणजे संवैधानिक मूल्यांची सर्वात मोठी थट्टा आहे', अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.उद्धव ठाकरेंचे माझ्यावरचे प्रेम जगजाहीर : नार्वेकर उद्धव ठाकरेंचे माझ्यावरचे प्रेम जगजाहीर आहे. त्यावर मी काही बोलू इच्छित नाही. आपल्या राज्यातील आपल्या सहका-याला अखिल भारतीय समितीची जबाबदारी प्राप्त झाल्यानंतर राज्यासाठी तो गौरवशाली क्षण असतो. अशावेळी शुभेच्छा देऊन विश्वास दर्शवण्यापेक्षा अशी टीका करणे म्हणजे आपल्या राज्याबद्दल आणि आपल्या राज्यातील व्यक्तीबद्दल अस्मिता नाही हे स्पष्ट होत आहे. माझ्यावर वैयक्तिक टीका करण्यापेक्षा मी केलेल्या कार्यावर केलेल्या कामाविषयी बोलण्याची धमक ठेवा. मी जो निर्णय दिला, त्या निर्णयाविरोधात कायदेशीररित्या काय चुकीचं आहे हे दाखवून देण्याची धमक उद्धव ठाकरे आणि जितेंद्र आव्हाडांमध्ये धमक नाही''अशी प्रतिक्रिया राहुल नार्वेकरांनी दिली आहे.

# आधी ममता, मग नितीश आता पुढचा नंबर आपचा?



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुका जवळ आल्या असून इंडिया आघाडीत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आधी राज्यातील सर्व जागांवर एकट्याने निवडणूक लढवण्याची घोषणा केली, त्यानंतर भारतीय जनता पक्षाने (भाजपा) नितीश कुमार यांना आपल्या बाजूने करून विरोधकांना मोठा धक्का दिला. काही महिन्यांतच एकापाठोपाठ एक दोन मोठे धक्के बसले असून आता आम आदमी पक्षाच्या भवितव्याबाबत चर्चेला उधाण आले आहे.पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी अलीकडेच दावा केला होता की, आम आदमी पक्ष राज्यातील सर्व १३ लोकसभेच्या जागा जिंकेल. पंजाब आणि दिल्लीत जागावाटपाबाबत आम आदमी पक्ष आणि काँग्रेसमध्ये चर्चा सुरू असून या दोन राज्यांमध्ये सत्तेत असलेल्या पक्षाने हरियाणामध्येही तीन जागांची मागणी केली आहे. हरियाणात आम आदमी पक्ष सक्रिय झाला आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी हरियाणातील जींद येथे एका जाहीर सभेला संबोधित केले. अरविंद केजरीवाल यांनी इंडिया आघाडीसोबत लोकसभा निवडणूक लढवू आणि त्याचवेळी विधानसभा निवडणूक एकट्याने लढवण्याची घोषणाही केली. लोकसभेच्या निवडणुका एप्रिल-मेमध्ये, तर विधानसभेच्या निवडणुका ऑक्टोबरमध्ये होणार आहेत. लोकसभा निवडणुकीपूर्वी आम आदमी पक्ष सक्रिय झाला असून तयारी केली जात आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल म्हणाले की, आज लोकांचा फक्त एकाच पक्षावर विश्वास आहे, तो म्हणजे आम आदमी पक्ष. त्यांनी दिल्ली आणि पंजाब सरकारच्या कामाचा उल्लेख केला आणि दोन्ही राज्यांमध्ये जनता आनंदी असल्याचे सांगितले. आज हरियाणात मोठ्या बदलांची गरज आहे. केजरीवाल यांनी काँग्रेसचे नाव न घेता हल्लाबोल करताना म्हटले की, राज्यातील जनता मागील सरकारांमुळे निराश झाली आहे. जनतेने प्रत्येक पक्षाला संधी दिली पण प्रत्येकाने आपली तिजोरी भरली.इंडिया आघाडीच्या बॅनरखाली लढणार दिल्ली आणि पंजाबमध्ये २४ तास वीज पुरवठा केला जातो. काँग्रेस, भाजपा, जेजेपी हे करू शकतात का? असा सवाल त्यांनी जनतेला केला. ते तसे करू शकत नाहीत. हे फक्त आम आदमी पक्षच करू शकते असेही म्हटले. केजरीवाल यांनी राज्यातील सर्व ९० विधानसभा जागांवर एकट्याने निवडणूक लढवण्याची घोषणा केली आणि आम्ही लोकसभा निवडणूक इंडिया आघाडीच्या बॅनरखाली लढणार असल्याचेही सांगितले.

# लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबासारखे संघर्षशील नेतृत्व पुन्हा होणे नाही - आ. कराड लातूर जिपच्या परिसरात स्व. मुंडे यांच्या पुतळ्याचे पाद्यपूजन

लातूर : - आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत आठरापगड जाती धर्मांना, वंचितांना न्याय देण्यासाठी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी संघर्ष केला. या संघर्षशील नेतृत्वाची उंची गाठणे कोणालाही शक्य नाही असा नेता पुन्हा होणे नाही. राज्यातील प्रशासकीय जागेत पहिला पुतळा लातूर येथे उभा राहतोय याचा मनस्वी समाधान आणि आनंद असल्याचे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

मराठवाड्याचे भूमिपुत्र, महाराष्ट्राचे लोकनेते, देशाचे माजी ग्रामविकास मंत्री स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा पूर्णाकृती पुतळा लातूर जिल्हा परिषद मुख्यालयाच्या परिसरात जिपच्या स्वनिधीतून तब्बल दीड कोटी रुपये खर्च करून बसवण्यात येत आहे. या पुतळ्याचे पाद्यपूजन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते रविवार २८ जानेवारी रोजी दुपारी नियोजित पुतळा परिसरात करण्यात आले. यावेळी खा. सुधाकर शृंगारे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अनमोल सागर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन दाताळ, कार्यकारी अभियंता देशपांडे,



भाजपा नेते राजेश कराड, जिल्हा सरचिटणीस विक्रमकाका शिंदे, भाजपा पंचायत राज व ग्रामविकास सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, जिल्हा परिषदेचे माजी सभापती रोहिदास वाघमारे, भाजपा ओबीसी आघाडीचे डॉ. बाबासाहेब घुले, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, अमोल पाटील, भागवत सोट, सतीश आंबेकर यांच्यासह जिल्हा परिषदेचे माजी पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेवटच्या क्षणापर्यंत आणि श्वासापर्यंत ज्यांनी आयुष्यभर संघर्ष केला आणि अंतही संघर्षात झाला असे आपले दैवत लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची आठवण आली तरी डोळ्यात पाणी येते असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, माझ्यासारख्या अनेकांना आमदार, खासदार, मंत्री, जिल्हा परिषद अध्यक्ष, सभापती, पदाधिकारी केले कार्यकर्त्यांना नेता करण्याची फॅक्टरी मुंडे साहेब होते.

शेवटच्या माणसाला भेटल्याशिवाय, त्यांचे समाधान केल्याशिवाय रात्री कितीही उशीर झाला तरी झोपत नव्हते. त्यांचा दरवाजा कधीच बंद नव्हता अडलेल्यांना, नडलेल्यांना मदत केली आज जर मुंडे साहेब असते तर देशाच्या आणि राज्याचे चित्र वेगळे राहिले असते मुंडे साहेबांच्या संस्कारात आणि कर्तृत्वात आम्ही तयार झालो त्यांच्या संस्कारातून कृपा आशीर्वादाने गोरगरीब जनतेची सेवा कशी करता येईल यासाठी प्रयत्न करत आहोत असे सांगून लोकनेते मुंडे साहेबांच्या स्मारक लोकार्पण सोहळ्यासाठी अनेक मान्यवरांना निमंत्रण दिले आहे. लवकरच अत्यंत चांगला आणि देखना लोकार्पण सोहळा होणार असल्याची माहिती भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

मुंडे साहेबांच्या प्रेरणेमुळेच आम्ही राजकारणात आलो असल्याचे खा. सुधाकर शृंगारे यांनी बोलून दाखवले तर दिलीपराव देशमुख यांनी मुंडे साहेबांच्या कार्याला उजाळा दिला. प्रारंभी डॉ. बाबासाहेब घुले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी मुंडे साहेबांच्या पुतळ्याचे शिल्पकार विजय बोंदर यांचा आ.कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

या कार्यक्रमास धर्मपाल देवशेट्टे, विजय गंभीरे, शरद दरेकर, सुकेश भंडारे, भैरवनाथ पिसाळ, सिद्धेश्वर मामडगे, सुरेश लहाने, ईश्वर गुडे, श्रीमंत नागरगोजे, अच्युत कातळे, बालासाहेब शेप, उज्वल कांबळे, रमा चव्हाण, आनंत सरवदे, बालासाहेब कदम, लता भोसले, ललिता कांबळे, शिला आचार्य, सुरेश बुड्डे, गोविंदराव देशमुख, दिनकर राठोड, गणेश चव्हाण, ईश्वर बुलबुले, महादेव घुले, निवृत्ती लहाने, व्यंकटराव मुंडे, अरविंद फड, अरविंद सुरकुटे, गणेश केंद्रे, बाळू पाटील यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

# ओसाड गावची पाटीलकी

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची 'भारत न्याय यात्रा' नेमकी याच वेळी बंगालमध्ये प्रवेश करते आहे. तिकडे, 'इंडिया'चा आणखी एक सदस्य असणारा आम आदमी पक्ष पंजाबमध्ये लोकसभेच्या जागा काँग्रेसला सोबत न घेता लढणार आहे.एकीकडे प्रचाराचा एक शब्दही न उच्चारता पंतप्रधान नरेंद्र मोदी अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या साक्षीने निवडणूक प्रचार मोहिमेचा नारळ वाढवत असताना 'इंडिया' असे हुशारीने निवडलेले नाव धारण करणारी विरोधकांची आघाडी आधीच खिळखिळी व्हायला लागावी, यात काहीही नवल नाही. १९६७ पासून हेच घडत आले आहे. भारतातील विरोधकांच्या राजकारणाचा जनुकीय नकाशाच सदोष आहे. भाजप विरोधकांमध्ये होता, तेव्हाही असेच चित्र होते आणि आता काँग्रेस विरोधकांमध्ये आहे, म्हणून ते चित्र काही सुधारलेले किंवा बदललेले नाही. 'इंडिया'तील सगळे पक्ष इमानदारीने एकत्र राहिले असते आणि भारतीय जनता पक्षाशी देशभर एकदिलाने लढले असते, तर भारताची संसदीय लोकशाही चार पावले पुढे गेली असती; पण तसे होणार नव्हतेच. बराच वेळ क्रोधागारात राहणाऱ्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी, 'आम्हाला बंगालमध्ये काँग्रेसची गरज नाही. आमचे आम्ही भाजपशी लढू,' असा त्रागा बुधवारी केला. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची 'भारत न्याय यात्रा' नेमकी याच वेळी बंगालमध्ये प्रवेश करते आहे. तिकडे, 'इंडिया'चा आणखी एक सदस्य असणारा आम आदमी पक्ष पंजाबमध्ये लोकसभेच्या जागा काँग्रेसला सोबत न घेता लढणार आहे. आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल अजून याबाबत काही बोलले नसले, तरी पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान काँग्रेसला सोबत घेण्यास तयार नाहीत. याच वेळी बिहारमधील नितीश कुमार यांचे सरकार राहते की जाते, अशी दोलायमान राजकीय स्थिती असतानाही काँग्रेसला सोबत घेण्यास नितीश फार उत्सुक नसावेत. उलट, कर्पूरी ठाकूर यांना मरणोत्तर भारतरत्न दिल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानताना नितीश यांनी, 'ठाकूर यांनी कधीही आपल्या कुटुंबातील सदस्यांना राजकारणात पुढे करून घराणेशाही चालविली नाही,' असा टोला काँग्रेसला लगावला आहे.भव्य उपकरणांचा सेल – २६ जानेवारीपर्यंत सर्वाधिक विक्री होणाऱ्या उपकरणांवर ५५% पर्यंत सूट अशा साऱ्या पार्श्वभूमीवर 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व कोण करणार, तीत काँग्रेसला काय स्थान असणार आणि देशभरात भाजपला आव्हान देऊ शकेल, अशी जबरदस्त प्रचारमोहीम कधी आखली जाणार, या प्रश्नांची उत्तरे अद्यापही मिळालेली नाहीत. दिवसागणिक निवडणूक जवळ येते आहे. 'इंडिया' आघाडीतील नितीश कुमार आणि ममता बॅनर्जी हे कधी काळी भाजपचे मित्रपक्ष होते आणि तेव्हाही काँग्रेसवर कठोर टीका करीत होते. नितीश यांच्या तर रक्तातच समाजवादी काँग्रेसविरोध आहे; पण ममता बॅनर्जी यांच्या इतक्या तीव्र काँग्रेस तिरस्काराचे अनेकांना आश्चर्य वाटते. मात्र, 'भारत न्याय यात्रा' बंगालमधून जात असल्याचे साधे आपल्या कानावरही घातले नाही, अशी तक्रार ममतादीदी करीत आहेत. ही तक्रार खरी असेल, तर आधीच अहंकारी असणाऱ्या ममतांचा पारा किती वर गेला असेल, याची कल्पना करता येते. ममता उघडच राहुल यांचे वर्णन 'नरेंद्र मोदी यांचा टीआरपी' असे करतात आणि खासगीत तर याहूनही कठोर शब्दांत आपला संताप व्यक्त करतात. अशी परिस्थती असेल, तर देशभरातील प्रत्येक राज्यात भाजपच्या विरोधात एकास एक उमेदवार कसा उभा राहणार आणि सत्तेवर येण्याचे 'इंडिया'चे स्वप्न कसे काय पुरे होणार?अखिल भारतीय काँग्रेसचे सध्याचे चाणक्य आणि राहुल गांधी यांचे विश्वासू जयराम रमेश यांनी भारत न्याय यात्रेतूनच, 'ममता दीदी या 'इंडिया'च्या महत्त्वाच्या नेत्या असून, त्यांच्याशी आम्ही पुन्हा संवाद साधू,' असे म्हटले आहे. ममता बॅनर्जी यांची विश्वासात न घेतल्याची तक्रार खरी असेल, तर जयराम रमेश यांनी ही यात्रा सुरू होण्याआधीच ममतांशी संवाद साधण्याचा सल्ला राहुल गांधी यांना द्यायला हवा होता. ममता या बंगालच्या मुख्यमंत्री आहेत. 'इंडिया'च्या नेत्या आहेत. मग बंगालमधली यात्रा त्यांच्याच पुढाकाराने निघाली असती, तर काय बिघडले असते? मुळात ही न्याय यात्रा सुरू होण्याआधीच 'इंडिया'तील काही पक्षांनी ही यात्रा एकट्या काँग्रेसची असण्याऐवजी विरोधकांच्या संपूर्ण आघाडीची असायला हवी होती, असे म्हणायला सुरुवात केली होती. खरोखरच तसे असायला काही हरकत नव्हती; पण आपण स्वबळावरच लढाई करू शकतो, असेच जर कुणाला वाटत असेल, तर सगळ्या विरोधकांना एकत्र तरी कशाला करायचे? भारतातील बहुतेक प्रादेशिक पक्ष एकखांबी तंबू झाले आहेत. त्यातील बहुतेक तर एकेका घराण्यांच्या जहागिऱ्या बनल्या आहेत. महाराष्ट्रात पाहिले तरी हेच दिसेल. अशा वेळी सगळ्या विरोधकांनी ताकदीने एकत्र आघाडी बांधायची, आपापले व्यक्तिगत अहंकार बाजूला ठेवायचे आणि ठोस पर्यायी आर्थिक–सामाजिक कार्यक्रम मतदारांसमोर ठेवून सत्ताधाऱ्यांना आव्हान द्यायचे, हे निव्वळ स्वप्न उरते. ममता, भगवंत मान जाहीरपणे बोलले; पण काँग्रेसच्या अहंकारी वृत्तीबद्दल नितीश ते अखिलेश असे सारेच नाराज असतात. काँग्रेसला ओसाड गावची पाटीलकी करायची नसेल, तर आजच चार पावले पुढे जाऊन सगळ्या विरोधकांशी पुन्हा संवाद साधायला हवा. आजचे विरोधी ऐक्याचे चित्र मात्र निराशाजनक आहे.

# सन्मानाचे 'टायमिंग'!

मागासवर्गीयांना त्यांच्या हक्काचे प्रतिनिधित्व व संधी मिळाव्यात यासाठी आयुष्यभर संघर्षरत राहिलेल्या जननायक कर्पुरी ठाकूर यांना त्यांच्या जन्मशताब्दीच्या सांगतेचे निमित्त साधत केंद्र सरकारने मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान जाहीर केला आहे. कर्पुरी ठाकूर यांचे अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान लक्षात घेता त्यांना जाहीर करण्यात आलेल्या या सन्मानाचे स्वागतच! मात्र, तो जाहीर करताना चाणाक्ष सरकारने जे 'टायमिंग' साधले आहे त्यावर सरकारच्या या हेतूत राजकीय स्वार्थाचीही शंका आल्याशिवाय रहात नाही. त्याची चर्चा होणे अपरिहार्यच! प्रथम कर्पुरी ठाकूर यांच्या योगदानाविषयी– आजही मागास वा बिमारू राज्य ही ओळख पुरती पुसू न शकलेल्या बिहारमध्ये बरोबर शंभर वर्षांपूर्वी कर्पुरी ठाकूर यांचा एका नाभिक कुटुंबात जन्म झाला. मागास प्रांतातील मागास समाजाच्या व्यथा, वेदना अनुभवत ते मोठे झाले. या समाजाने प्रगतीची कास धरावी यासाठी प्रस्थापितविरोधी राजकारणाच्या म्हणजेच बिगर काँग्रेसवादाच्या प्रवाहात कर्पुरी ठाकूर यांनी देशाच्या स्वातंत्र्यानंतर उडी घेतली.तत्पूर्वी त्यांनी कॉलेजच्या शिक्षणाला रामराम ठोकून स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. 'भारत छोडो' चळवळीच्या आंदोलनादरम्यान त्यांना अटक झाली. त्यांनी जवळपास ३ वर्षे तुरुंगवास भोगला. स्वातंत्र्यानंतर आपल्याच खेड्यात शाळेत शिक्षक म्हणून काम करताना त्यांना समाजातील 'आहे रे' व 'नाही रे' यांच्यातील प्रचंड मोठ्या दरीने व्यथित केले. 'नाही रे' वर्गाच्या हक्कांसाठी व अधिकारांसाठी मग ते समाजकारणात उतरले! त्यासाठी अर्थातच त्यांनी समाजवादी विचारांचा मार्ग जवळ केला. १९५२च्या बिहार विधानसभा निवडणुकीत कर्पुरी ठाकूर समाजवादी पक्षाचे उमेदवार म्हणून निवडून आले. त्यावेळी त्यांनी कामगारांच्या, टपाल कर्मचाऱ्यांच्या हक्कासाठी अनेक लढे उभे केले. या लढ्यात त्यांनी प्रदीर्घ उपोषणेही केली. १९५६ साली लोहियांनी त्यावेळच्या काँग्रेस सरकारविरुद्ध मोठे आंदोलन सुरू केले होते. समाजातील जातिभेद नष्ट केल्याशिवाय आर्थिक क्षेत्रात समानता येणार नाही, अशी भूमिका मांडून त्यांनी मागास जातींना न्याय मिळावा, अशी मागणी लावून धरली. बिहारमध्ये त्यावेळी शेतजमीन मोठ्या प्रमाणात राजपूत व भूमीहार यांच्या हाती एकवटलेली होती. सरकारी नोकऱ्यांमध्ये कायस्थ जातीची एकाधिकारशाही निर्माण झालेली होती.त्यामुळे लोहियांच्या या आंदोलनास बिहारमध्ये प्रचंड प्रतिसाद मिळाला. या आंदोलनात कर्पुरी ठाकूर यांनी स्वत:ला झोकून दिले होते. त्यातूनच एका नव्या नेत्याचा जन्म झाला. पुढे कर्पुरी ठाकूर यांनी ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजुरांचे प्रश्न लावून धरले. कामगार चळवळीतही त्यांचा अत्यंत सक्रिय सहभाग राहिला. १९६० सालच्या केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या संपाला पाठिंबा दिला म्हणून त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. दक्षिण बिहारमधील टाटा स्टीलच्या कामगारांच्या १९७० सालच्या संपात उतरल्याने त्यांना शिक्षाही भोगावी लागली. त्यावेळी त्यांनी २८ दिवसांचे उपोषण केले होते. सरकारी कामकाज व शिक्षण यांचे माध्यम लोकभाषाच असली पाहिजे या भूमिकेतून लोहियांनी 'अंग्रेजी हटाव' ही चळवळ चालवली होती. १९७० साली बिहारमध्ये पहिले बिगर काँग्रेसी सरकार सत्तेवर आले. या सरकारमध्ये कर्पुरी ठाकूर उपमुख्यमंत्री होते. प्रशासनाचा कारभार हिंदीतूनच चालावा, असा आग्रह त्यांनी धरला आणि त्यावरूनच त्यांना मंत्रिपद सोडावे लागले. पुढे ते चरणसिंह यांच्या भारतीय क्रांती दलात सामील झाले. राज्यभर दौरे काढून त्यांनी मागास जातींना संघटित केले. १९७१ च्या भूमीमुक्ती आंदोलनात भाग घेऊन अनेक जिल्ह्यांत त्यांनी मागास जातीच्या शेतमजुरांना शेतजमिनी मिळवून दिल्या. कर्पुरी ठाकूर हे जयप्रकाश नारायण यांचे लाडके शिष्य होते. आणीबाणी व संपूर्ण क्रांती लढ्यात त्यांनी स्वत:ला झोकून दिले होते.इंदिरा गांधी यांचा पराभव करून जनता पक्ष सत्तेवर आल्यावर बिहारमध्येही जनता पक्षाची सत्ता आली. कर्पुरी ठाकूर बिहारचे मुख्यमंत्री बनले. सरकारी नोकऱ्यांमध्ये मागास जातींना आरक्षण असावे, असा अहवाल मुंगेरीलाल आयोगाने दिला होता. तो लागू करण्याचा निर्णय कर्पुरी ठाकूर यांनी घेतला. मात्र पक्षातील उच्चजातीय आमदारांनी त्याला विरोध केल्याने कर्पुरी ठाकूर यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. १९७९ साली जनता पक्ष फुटला तेव्हा त्यांनी चरणसिंह यांना साथ दिली. १९८०च्या निवडणुकीत जनता पक्ष सेक्युलरचे उमेदवार म्हणून ते निवडून आले व पुन्हा मुख्यमंत्री बनले. त्यांनी बिहारमध्ये संपूर्ण दारूबंदी केली. कर्पुरी ठाकूर यांचे वंचित, कामगार, शेतकरी, शेतमजूर, महिला या वर्गासाठीचे काम अमोघच होते. मात्र, त्यांचे मुख्यमंत्री म्हणून तयार केलेले आरक्षणाचे मॉडेल हे कधीही न विसरता येणारेच आहे. त्यांच्या या मॉडेलनुसार आरक्षणात ओबीसींना १२ टक्के, अतिमागासांना ८ टक्के, महिलांसाठी ३ टक्के आणि उच्च जातीतील आर्थिकदृष्ट्या मागासांसाठी तीन टक्के असे आरक्षण सरकारी नोकऱ्यांत ठेवण्याची शिफारस होती. आरक्षण धोरणाचा असा सखोल व व्यापक विचार करणारा नेता म्हणून कर्पुरी ठाकूर देशाच्या कायमच स्मरणात राहतील.अशा या नेत्यास त्यांच्या जन्मशताब्दी सांगतेच्या निमित्ताने भारतरत्न सन्मानाने गौरविले जाणे अत्यंत स्वागतार्हच! आता या सन्मानाच्या टायमिंगविषयी– सरकारचा युक्तिवाद असाच की, जन्मशताब्दी सांगतेचे निमित्त साधून हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. तांत्रिकदृष्ट्या हा युक्तिवाद बिनतोडच! मात्र, विद्यमान सरकारला लोकसभा निवडणुकीच्या तोंडावरच कायम विरोधकांच्या खेम्यातील गुणवानांची स्वपक्षीय विचारधारेच्या गुणवानांपेक्षा अतितीव्रतेने आठवण का होते? हा मात्र प्रश्नच! उदाहरणच द्यायचे तर २०१९ च्या निवडणुकीपूर्वी विद्यमान सत्ताधाऱ्यांना त्यांच्यासाठी निवडणुकीच्या राजकारणातील निकड बनलेल्या पूर्व भारतातील प्रणव मुखर्जी व संगीतकार भूपेन हजारिका यांची तीव्रतेने आठवण होते. तशीच आठवण होऊन ज्यांना राज्यातील भाजप नेत्यांनी भ्रष्टाचाराचे प्रतीक ठरवले अशा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या महतीची खात्री पटून केंद्रातील भाजप सरकार मात्र त्यांना पद्मविभूषण सन्मानाने गौरवते.ज्यांची भाजपने सतत 'मुल्ला मुलायम' अशा शब्दांत हेटाळणी केली त्यांना मरणोत्तर पद्मविभूषण जाहीर करून 'पापक्षालन' करण्याची उबळ भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला येते आणि आता बिहारमध्ये भाजपची साथ सोडून नितीशकुमार यांनी लालू प्रसाद यादव यांच्या पक्षाचा व काँग्रेसचा हात धरलेला असताना व जातगणनेची मागणी लावून धरलेली असताना त्यावरून अडचणीत सापडलेल्या विद्यमान भाजप नेतृत्वाला याच नितीशकुमार, लालू यांना घडविणाऱ्या कर्पुरी ठाकूर यांच्या अमोघ कार्याचे स्मरण होते व त्यांना 'भारतरत्न'ने गौरवणे गरजेचे वाटते. एवढेच नाही तर स्वत: पंतप्रधानांना देशातील तमाम सर्वभाषिक वृत्तपत्रांमध्ये स्वत:च्या नावे कर्पुरी ठाकूर यांच्यावरील लेख प्रसिद्ध करून त्यांच्या महान कार्याची माहिती जनतेपर्यंत व्यापकपणे पोहोचविणे गरजेचे वाटते! कर्पुरी ठाकूर यांना भारतरत्न सन्मानाने गौरविण्याच्या विद्यमान सरकारच्या निर्णयाचे मनापासून स्वागत करतानाच या सन्मानाच्या टायमिंगबाबत विद्यमान सरकारचे कौतुक करावे की सन्मानाचा वापर राजकीय हित साधण्यासाठी करण्याच्या सत्ताधाऱ्यांच्या मानसिकतेची निर्भत्सना करावी, हा प्रश्न नक्कीच उपस्थित होतो, हे मात्र निश्चित!

# तैवान पुन्हा धुमसणार, कारण..

भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स धोरणाचे एक शिल्पकार, खासगी टीव्ही वाहिन्यांना वाट देणारे सल्लागार, 'एटीएम' यंत्राचा वापर सुरू करणारे पहिले उद्योजक ही त्यांची ओळख आताच्या पिढीला करून द्यावी लागेल!प्रभाकर देवधर गेले किती नावांनी ते ओळखले जात? राजीव गांधी त्यांना प्रभू देवधर म्हणून पुकारायचे. उद्योग जगतात ते पी. एस. देवधर होते. मित्र मंडळी त्यांना प्रभाकर देवधर म्हणायचे तर घरी ते सगळ्यांचे आण्णा होते.देवधरांचा जन्म २५ सप्टेंबर १९३४ रोजी पुण्यात झाला. ते पुण्याच्या प्रख्यात नूतन मराठी विद्यालयाचे १९५२ सालचे एसएससी आणि पुण्याच्या कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगचे टेलिकम्युनिकेशन इंजिनीअर होते. वडील दंतवैद्य असल्याने सर्व हत्यारे घरात होती व ती सर्व ते शाळेत असल्यापासून वापरू लागले होते! सुरुवातीला काही काळ ते 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रीसर्च'च्या वैद्यकीय उपकरणे विकसित करण्याच्या गटात होते. पण लवकरच त्यांनी स्वतःची 'पलॅब इंडस्ट्री' काढली आणि ६४ वर्षे चालवली. या काळात त्यांनी ६५० उपकरणे विकसित करून कारखान्यात बनवली आणि भारतातच नव्हे तर चीन धरून अनेक देशांत विकली. १९८० ते २०१५ या काळात त्यांनी शंभर वेळा व्यवसायानिमित चीनला भेटी दिल्या आणि २०२० साली चीनवर 'सिनास्थान' हे पुस्तक मराठी व इंग्रजीत लिहिले.एटीएम : कंपनीतले आणि दादरचे १९६८ साली त्यांनी दादरच्या महाराष्ट्र बँकेसाठी पहिले 'एटीएम मशीन' बनवून दिले. त्यांचे सर्व प्रॉडक्टस उत्तम विकले जात असतानाही ते आणखी बनवण्यासाठी २–४ कारखाने काढून आपला व्यवसाय २०० कोटी वरून हजार कोटी करण्यात त्यांना रस नव्हता. तर ते नवीन वस्तू विकसित करण्याच्या मागे लागत. त्या अर्थाने ते संशोधक उद्योगपती होते. त्यांनी पेट्रोल पंपावर पेट्रोल मोजणारे उपकरण बनवले. शाळा–महाविद्यालयांच्या प्रयोगाशाळांना लागणारी कॅथोड रे ऑसिलोग्राफ, रिहोस्टॅटसारखी अनेक उपकरणे बनवली. ती अनेक वर्षे इंग्लंडला विकली. एकदा ते आणि मी सोलापूरला गेलो असता तेथील दयानंद महाविद्यालयाला भेट दिली होती. जेव्हा तेथील विज्ञानाच्या प्राध्यापकांना मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रभाकर देवधर हे पलॅब इंडस्ट्रीचे मालक आहेत असे समजले, तेव्हा ते प्राध्यापक म्हणाले होते : तुमची उपकरणे एवढी भक्कम आहेत की, आम्हाला गेल्या २०–२५ वर्षात काहीही दुरुस्ती करावी लागली नाही!पंचावन्न वर्षे देवधरांनी कारखाना चालवला आणि आता त्यांचा मुलगा तो चालवतो. पण देवधरांच्या ५५ वर्षाच्या कारकीर्दीत एकदाही कारखान्यात संप झाला नव्हता. ते या कंपनीचे अध्यक्ष होते, पण आपल्या केबिनमध्ये बसून कारभार पाहाणारे नव्हते, तर शॉप फ्लोअरवर कामगारांत मिसळून आपली वस्तू कामगारांच्या बरोबरीने विकसित करीत असत. कोणी कामगाराने त्यात एखादी चांगली गोष्ट सुचवली तर ती ते मान्य करून अमलात आणत असत. त्या अर्थाने कामगारात मिसळणारा हा दुर्लभ मालक होता. कामगारांना पगार मिळाला की, तो लगेच खर्च करायची प्रवृत्ती असते आणि मग महिन्याच्या २० तारखेला त्यांना कडकी लागते. मग ते कापड गिरणी कामगारांच्या भाषेत खर्ची (डव्हान्स) मागायला येतात. त्यासाठी त्यांना फॉर्म भरावा लागतो, खात्याच्या सुपरवायजरची सही घ्यावी लागते. हिशेब खात्याला तो अर्ज द्यावा लागतो व मग एक–दोन दिवसांनी खर्ची मिळते. त्यावर सन्मान्य तोडगा देवधरांनी आपल्या कारखान्यात काढला होता. त्यांनी कामगारांसाठी एक एटीएम मशीन बसवून त्यावर लिहिले होते, 'यू कॅन ड्रॉ युवर सॅलरी एनी टाईम' . त्यामुळे कामगारांना कोणापुढे हांजी हांजी करावी लागत नसे व पुढच्या महिन्याच्या पगारातून तेवढी रक्कम आपोआप कापली जात असे.इलेक्ट्रॉनिक धोरणात सहभाग राजीव गांधी एअर इंडियात पायलट असताना इंग्लंड–मुंबई एक फेरी झाल्यावर त्यांना मुंबईत एक दिवस सुट्टी मिळत असे. त्यांना इलेक्ट्रॉनिक्सची आवड असल्याने ते इलेक्ट्रॉनिक्स मार्केटमध्ये फिरत असत आणि तेथील एक व्यापारी मनुभाई देसाई यांना आपल्या इलेक्ट्रॉनिक्समधील शंका विचारत असत. मग मनुभाई एकदा राजीव गांधींना म्हणाले, 'तुमच्या शंकांचे निरसन मी करू शकत नाही. तुम्ही प्रभाकर देवधर यांना भेटा'. मग ते देवधरांना भेटायला पलॅब इंडस्ट्रीत जाऊ लागले. असे काही वर्षे झाले. दरम्यान संजय गांधी यांचा विमान अपघात झाल्यावर इंदिरा गांधींनी राजीव गांधींना नोकरी सोडून त्यांना मदत करायला सांगितले. ते त्यांनी नाइलाजाने स्वीकारले. इंदिरा गांधींना रोज शेकडो पत्रे खासगीत येत व त्यातील बरीच तंत्रज्ञानविषयक असत. त्याची उत्तरे राजीव गांधींना देता येत नसत. मग ते एक दिवस देवधरांना म्हणाले, 'प्रभू, तुम्ही ठाणे सोडून इथे दिल्लीत येऊन राहा'. देवधर म्हणाले, 'इथे माझा कारखाना आहे. मी नाही येणार'. पण राजीव खूप मागे लागल्यावर देवधर दर शनिवार–रविवारी दिल्लीत जाऊन राजीवना मदत करू लागले. असेच एक दिवस काम चालू असता, त्या दालनातून इंदिरा गांधी जात असताना राजीव आपल्या आईला म्हणाले, 'हे प्रभू देवधर तुझ्या इलेक्ट्रॉनिक्स पॉलिसीवर टीका करीत आहेत'. तेव्हा इंदिरा गांधींनी 'काय टीका आहे' असे विचारता देवधर म्हणाले, 'तुम्हाला जेव्हा तासभर वेळ असेल तेव्हा मी सांगतो'. ते ऐकल्यावर इंदिरा गांधी देवधरांच्या समोर बसल्या व म्हणाल्या, मला आत्ता वेळ आहे, सांगा. मग देवधरांनी सुधारणा सुचवल्या व त्या अमलात आणल्याने पुढील पाच वर्षांत आपली निर्यात दहापटीने वाढेल असे सांगितले, त्यावर इंदिरा गांधी म्हणाल्या, 'हे तुम्ही मला लिहून द्या'. देवधरांनी काही केले नाही, कारण त्यांना माहीत होते की, हे राजकारणी लोक तोंडदेखले बोलतात. पण एक महिन्याने इंदिरा गांधींचे सेक्रेटरी गोपी अरोरा यांचा देवधरांना फोन आला की, 'तुम्ही मॅडमला काही शुअर केले होते, त्या त्याची वाट पाहात आहेत.' मग देवधरांनी पॉलिसी लिहून पाठवली. ती इंदिरा गांधींनी १९८४ मध्ये अमलात आणली. देवधर म्हणाले त्याप्रमाणे भारताची इलेक्ट्रॉनिक्समधली निर्यात दहापटीने वाढली. पण ते बघायला इंदिरा गांधी हयात नव्हत्या. सॅम पित्रोडा आपली अमेरिकेतील चांगली नोकरी सोडून भारतात येऊन सरकारला मदत करू इच्छित होते, त्यात त्यांचा यात काय हेतू आहे हे जाणून घेण्यासाठी इंदिरा गांधींनी देवधरांना अमेरिकेत पाठवले होते. 'देवधर समिती'ने सुचवल्याप्रमाणे १९९२ साली भारतात अनेक खासगी वाहिन्यांना टीव्ही सुरू करायला परवानगी मिळाली होती!सचोटी आणि साधेपणा पुढे राजीव गांधी पंतप्रधान झाल्यावर त्यांनी देवधरांना भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स कमिशनचे अध्यक्ष केले, पण सनदी अधिकाऱ्यांनी त्यांचे बरेच अधिकार कमी केल्याने ते तिथे कंटाळले होते. त्याच काळात त्यांनी 'कॅपिटल पनिशमेंट' हा कविता संग्रह लिहिला. त्यावेळी त्यांनी या पदाचे मानधन म्हणून दरमहा एक रुपया घेतला व त्यांच्या या दिल्लीच्या मुक्कामात त्यांचा कारखाना पाहणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांनी सांगितले होते की, मी तिथे असेपर्यंत सरकारची एकही ऑर्डर घ्यायची नाही.'त्या वेळी तुम्ही राजीव गांधी यांच्या इतक्या जवळचे असताना तुम्हाला एकही पद्म पुरस्कार कसा नाही?' असे मी विचारल्यावर देवधर म्हणाले, 'मी तो मागितला पाहिजे होता ना?' आणि 'तो मिळाल्याने काय होते हो?' असा प्रतिप्रश्न त्यांनी मलाच विचारला.देवधर २००० ते २०१४ या काळात मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष होते व नंतर २०१४ ते मृत्यूपर्यंत परिषदेचे विश्वस्त होते. करोना काळात दोन वर्षे घरी बसावे लागल्याने देवधरांची तब्येत घसरली. वजन ३२ किलोने कमी झाले. एरवी सव्वा सहा फूट उच्च असलेले, अंगावर एकही ग्रॅम मेद नसलेले, निळे करारी डोळे असलेले देवधर पाहावत नव्हते आणि अखेर ते शनिवार दिनांक २७ जानेवारीला वयाच्या ८९व्या वर्षी विश्वकर्म्यात विलीन झाले. माझा नूतन मराठी विद्यालयातील माझ्यापेक्षा वयाने आठ वर्षांनी मोठा असलेला मित्र हरपला.

# एमपीडीए खाली कोयता बाळगणारा सराईत, धोकादायक गुंड स्थानबद्ध. लातूर पोलिसांची मोठी कारवाई.

लातूर :- एमपीडीए खाली कोयता बाळगणारा सराईत, धोकादायक गुंड स्थानबद्ध. लातूर पोलिसांची मोठी कारवाई. जिल्ह्यातील एम.पी.डी.ए. नुसार करण्यात आलेली पाचवी कारवाई. सार्वजनिक शांततेस धोका असल्याने जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी, लातूर वर्षा ठाकूर-घुगे यांनी त्याच्या स्थानबद्धतेचा प्रस्ताव मंजूर केला.

वाढत्या गुन्हेगारीला लगाम लावण्यासाठी पोलिस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांच्या आदेशान्वये विवेकानंद चौक पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी महाराष्ट्र झोपडपट्टीदादा (एमपीडीए) कायद्यांतर्गत लातूर जिल्ह्यातील पवन सहदेव जाधव, वय २१ वर्ष, राहणार संजय नगर,औसा सध्या राहणार म्हाडा कॉलनी, लातूर याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाईचा शहरातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आणणार्या गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी व त्यांची गुन्हेगारी रोखण्यासाठी लातूर पोलिसांकडून कडक प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.

पोलीस ठाणे विवेकानंद चौक हद्दीतील धोकादायक पवन सहदेव जाधव, वय २१ वर्ष, राहणार संजय नगर,औसा सध्या राहणार म्हाडा कॉलनी,लातूर याला 'एमपीडीए' कायद्याखाली एक वर्षासाठी स्थानबद्ध करुन त्याची रवानगी जिल्हा कारागृहात करण्यात आली आहे. जिल्ह्यातील एमपीडीए नुसार करण्यात आलेली ही पाचवी कारवाई आहे. कुख्यात गुंडाविरुद्ध पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे मार्गदर्शनात एमपीडीए नुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

कुख्यात गुंड पवन सहदेव जाधव,यांच्या विरुद्ध जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यामध्ये अत्यंत गंभीर स्वरूपाचे पाच गुन्ह्यांची नोंद असून त्यामध्ये जीवे मारण्याचा प्रयत्न, कट रचून-भीती दाखवणे, मालमत्तेचे नुकसान, जबरी चोरी,गंभीर दुखापत करणे, दहशत निर्माण करुन मालमत्तेचे नुकसान करणे, शिवीगाळ करणे,बेकायदेशीर जमाव गोळा करुन दहशत करणे, बेकायदेशीर घातक शस्त्र वापरणे,चोरी करणे अशा प्रकारचे गुन्हे त्याच्यावर दाखल आहेत. तसेच तो नेहमी लोखंडी कोयता बाळगून असल्याने जनसामान्यात त्याची भीती होती. त्याच्याकडून सार्वजनिक शांततेस धोका असल्याने पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे निर्देशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर)भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चौक चे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक घारगे, विश्वंभर पल्लेवाड, पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, पोलीस अमलदार संतोष खांडेकर, सुधीर साळुंखे, बहादूर सय्यद, रमेश नामदास,पांडुरंग सागरे यांनी नमूद आरोपी विरुद्ध एमपीडीए कायद्यानुसार प्रस्ताव तयार करून जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजुरी पाठविण्यात आला होता. जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी, लातूर वर्षा ठाकूर घुगे यांनी त्याच्या स्थानबद्धतेचा प्रस्ताव मंजूर केला आहे. त्यावरून सदर आरोपीची २५ जानेवारी रोजी जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

काय आहे एमपीडीए कायदा?

महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ,पायरसी) वाळू तस्कर व अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे गुन्हेगार यांच्या विघातक कृतींना प्रतिबंध करण्याविषयीचा कायदा सन १९८१ (सुधारणा १९९६, २००९ व २०१५) अंतर्गत स्थानबद्धतेचा आदेश म्हणजेच एमपीडीए (महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डेंजरस ॲक्टिविटी) होय. सराईत गुन्हेगार किंवा सातत्याने सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था भंग करणार्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध एमपीडीएची कारवाई करता येते. या कायद्यानुसार सराईत गुन्हेगाराला एक वर्षासाठी कारागृहात स्थानबद्ध करण्यात येते.

सतत गुन्हेगारी कृत्य करणारे गुंड प्रवृत्तीच्या व एकापेक्षा अधिक गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद असलेल्या गुंड व्यक्तीं ची माहिती संकलित करून त्यांच्याविरुद्ध एमपीडीए (महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ डेंजरस ॲक्टिविटी) सारख्या कठोर कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येत असून यानंतरही लातूर जिल्ह्यातील गुंडगिरी व भाईगिरी वृत्तीचा समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनात समाजविघातक प्रवृत्तींना आळा घालण्याकरिता सदरची कार्यवाही करण्यात येणार असून लातूर पोलीस कडून जिल्ह्यातील धोकादायक गुंड व गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद असलेल्या कुख्यात इसमांची माहिती संकलित करण्यात येत आहे.

# गरिब, गरजूवंतांसाठी मुंबईकरांनो पुढाकार घ्या, के रवी दादा यांची भावनिक साद







लातूर :- गरिब, गरजूवंतांसाठी मुंबईकरांनो पुढाकार घ्या, के रवी दादा यांची भावनिक साद मुंबई, भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईतील गरीब, गरजूवतांसाठी मुंबईकरांनी पुढाकार घ्यावा, सहकार्यासाठी मदतीला धावून यावे, अशी भावनिक साद इंडिया मिडीया लिंक अँड इव्हेंट्स मॅनेजमेंटचे मॅनेजिंग डायरेक्टर के रवीदादा यांनी बोलताना सर्वसामान्यांना घातली आहे.

भारताच्या ७५ व्या सुवर्णमहोत्सवी प्रजासत्ताक दिनानिमित्ताने प्रजासत्ताकाच्या पूर्वसंध्येला मुंबईच्या केईएम, टाटा रुग्णालय परिसरात मॅनेजमेंटच्या माध्यमातून ध्वजारोहण आणि ब्लँकेट, फराळ किट,आकर्षक तिरंगा ध्वजचे मोफत वाटप कार्यक्रम आयोजित करन्यात आला . यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते. माजी नगरसेवक अनिल कोकीळ, ज्युनियर अभिनेता अनिल कपूर, फिरोज खान राजेश खन्ना, अभिनेत्री ऐश्वर्या रॉय (जूनियर) ॲड. वैशाली बोरुडे , बाळा देवदत्त भट, बंडू लोंढे, अभिनेता राहुल रवी आदि उपस्थित होते.

टाटा ,केईएम रुग्णालय परिसरात राहणा-या रुग्ण व त्यांच्या नातवाईकांना थंडीपासून बचाव व्हावा, यासाठी ब्लँकेट किटचे वाटप गेल्या १०वर्षापासून सुरु असून या ११ व्या वर्षीही हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. मुंबईच्या परळ येथून सुरु झालेला हा ब्लँकेट वाटपाचा उपक्रम भायखळा येथे आल्यानंतर गरजू महिलेला या उपक्रमाद्वारे दिलेल्या भेटवस्तूचा तिने स्वीकार करून के.रवी (दादा )यांचे मनःपूर्वक आभार मानले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात गेल्यानंतर रस्त्यावर झोपलेल्या गरीब नागरिकाला मदतीचे सहकार्य केल्यानंतर तो गरजू भारावून गेला. यावेळी ही सर्व दृश्य डोळ्यांनी पाहणाऱ्या फ्रेंच विदेशी नागरिकाने या उपक्रमाचे तोंड भरून कौतुक केले.

के. रवीदादा म्हणाले की, १० वर्षापूर्वी नागरिकांना मदत करण्याचा हा उपक्रम दरवर्षी आम्ही राबवीत आहोत. परंतू प्रत्येक वेळी सरकारी ,प्रशासकीय यंत्रणा व उद्यमी कामाला येतीलच , असे नाही, परंतू नागरिकांचीही काही कर्तव्य आहेत, ती आपण नित्यनियमाने पार पाडली पाहिजे. त्यासाठी मुंबईकरांनी गरजूवंतासाठी सहकार्याचा हात पुढे केला तर नक्कीच प्रत्येक गरजूवंत गरिबांचा आशीर्वाद मिळेल. त्याच बरोबर मुंबईकरांमध्ये आपुलकीची भावना निर्माण होईल, यावेळी अभिनेता राहुल रवी मार्गदर्शन करताना म्हणाले की, माझे वडील के.रवी (दादा) यांनी सुरू केलेला हा सामाजिक उपक्रम पुढील १११ वर्षे सुरू राहील, असा आशावादी अभिनेता राहुल रवी यांनी बोलताना व्यक्त केला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संवादक वरिष्ठ पत्रकार तानाजी कांबळे, पोलीस निरीक्षक सुशील जाधव ,पत्रकार केतन खेडेकर राजेंद्र साळस्कर पत्रकार उदय पवार ,अरविंद पटकुरे ,बाळा वडियार ,शरद रणपिसे ,पत्रकार महादू पवार विलास घडशी, राम तांबे, राहुल खैरे ,रमजान सिद्दिकी, महेंद्र शिर्के, फोटोग्राफर दिनेश परीशा, पत्रकार पुष्कर, सुरज मंडल, दिलीप बैरी, कोविल नाडर, कुन्नू यादव.

यावेळी भोईवाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष बोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्वेता शिंदे, पोलीस उपनिरिक्षक विशाल देवरे यांचे सहकार्य मिळाले. या सामाजिक उपक्रमामध्ये केईएम व टाटा रुग्णालयातील कर्मचाऱ्यानी सहकार्य केले.कार्य क्रमाची सांगता पहाटे सहा वाजता मुंबई गेटवे ऑफ इंडिया येथे झाली. तसेच मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेनेही नेहमी प्रमाणे सहकार्य केले ज्यांचे मॅनेजमेंटने आभार मानले

# संभाजी महाविद्यालयात साडी धोती डे साजरा

मुरुड/महेंद्र आल्टे : येथील संभाजी महाविद्यालयात मकर संक्रांतिनिमित्त दिनांक १६/०१/२०२४ रोजी सांस्कृतिक विभागाच्या वतीने साडी धोती डे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ पी. एस.देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मधुकर क्षीरसागर, प्रा.डॉ. ए.एस. कानडे, प्रा.डॉ.आर. एफ. अंबाड, आयक्युएसीचे समन्वयक प्रा. एम. बी. गायकवाड यांची उपस्थिती होती. तर प्रा.डॉ.एम.व्ही.चावरे, प्रा.सौ. पी.बी.महाजन, प्रा. पी.डी.चौधरी, प्रा. डॉ. तहेसीनबी अत्तार यांचीही विशेष उपस्थिती होती. प्रा.मधुकर क्षीरसागर यांनी पारंपरिक भारतीय सणांचे महत्त्व सांगितले तसेच आजच्या विद्यार्थ्यांनी या सणांमधून आपली संस्कृती टिकवून ठेवण्याचे आवाहन केले. प्रा. डॉ. ए.एस.कानडे बोलताना म्हणाले



की, भारतीय सणांमधून न्याय, स्वातंत्र्य आणि समता ही मूल्ये दिसून येतात. प्रा. डॉ.आर.एफ.अंबाड बोलताना म्हणाले की, भारत देशाला खूप मोठा सांस्कृतिक इतिहास आहे त्या इतिहासाची जाणीव जागृती आजच्या विद्यार्थ्यात होणे काळाची गरज आहे. तर प्रा.एम.बी.गायकवाड बोलताना म्हणाले की, भारतात विविध जातीचे, धर्माचे आणि पंथाचे लोक राहतात तरीही त्यांच्यामध्ये सण उत्सव प्रसंगी एकात्मता आणि बंधुता दिसून येते. ही एकात्मता आणि बंधुता आजच्या विद्यार्थ्यांनी टिकवून ठेवली पाहिजे. अध्यक्षीय समारोप करताना प्रा.डॉ.पी.एस. देशमुख म्हणाले की, आजचा विद्यार्थी हा बौद्धिक, शारीरिक आणि मानसिक दृष्टीने समृद्ध असणे आवश्यक आहे. अशी समृद्धता सांस्कृतिक कार्यक्रमांतून वाढीस लागते. म्हणून अशा उपक्रमांत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले पाहिजे. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. बी.एम. गोरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक केले. प्रस्ताविकात त्यांनी साडी धोती डे हा कार्यक्रम घेण्याचा उद्देश आणि भारतीय सण उत्सवांप्रती विद्यार्थ्यांची भूमिका काय असावी याचे सविस्तर विवेचन केले. आभार विद्यार्थीनी कु. अंजली केवलराम हिने मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने महाविद्यालयाचे विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत उपस्थित होते.

# खून करून आत्महत्या केल्याचा बनाव करणाऱ्या सख्ख्या भावाला व आईला खुनाच्या गुन्ह्यामध्ये अटक.

लातूर :- दारू पिऊन सतत भांडण तक्रारी करणाऱ्या भावाचा गळा आवळून खून केला व त्याने आत्महत्या केल्याचा बनाव रचला मात्र पोलिसांच्या चौकशीत सदरचा प्रकार उघडकीस आला.

याबाबत थोडक्यात हकीगत अशी की दिनांक २८/०१/२०२४ रोजी पोलीस ठाणे औसा येथे तक्रारदार सचिन बालाजी जाधव, राहणार तुंगी तालुका औसा याने पोलीस ठाणेला तक्रार दिली की, त्याचा लहान भाऊ योगेश बालाजी जाधव, वय २३ वर्ष याने त्यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये लोखंडी आडूला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. वगैरे तक्रार वरून पोलीस ठाणे औसा येथे क्रमांक १३/२०२४ कलम १७४ सीआरपीसी प्रमाणे आकस्मात मृत्यू दाखल करण्यात आला.

अकस्मात मृत्यू दाखल होताच अकस्मात मृत्यूच्या चौकशीत औसा पोलीस ठाण्याचे अधिकारी व अमलदारांनी घटनास्थळास भेट देऊन बारकाईने पाहणी केली. तसेच खबर देणार व इतरांकडे कौशल्यपूर्वक सखोल विचारपूस केली तेव्हा आत्महत्याची माहिती देणारे व इतर नातेवाईकांचे सांगणे व घटनास्थळाची परिस्थिती यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून आली.

सदरची परिस्थितीची माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावर पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे,उपविभागीय पोलीस अधिकारी औसा रामदास इंगवले यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे औसा चे पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड व त्यांच्या टीम ने बारकाईने चौकशी व विचारपूस केली तेव्हा मयत योगेश बालाजी जाधव याने आत्महत्या केली नसून मयत योगेश हा दारू पिऊन शुल्लक कारणासाठी सतत भांडण तक्रारी करत होता. दिनांक २७/०१/२०२४ रोजी त्याच्या शेतात रात्री दहा वाजण्याच्या सुमारास भाऊ सचिन बालाजी जाधव,व त्याची आई आणि मयत योगेश जाधव यांचेत कडाक्याचे भांडण झाले. त्यावेळी भाऊ सचिन बालाजी जाधव यांनी बाजूस पडलेल्या दोरीने योगेश जाधव याचा गळा आवळून खून केला व तो मयत झाल्या नंतर त्याला शेडमधील अळूला लटकावून योगेश याने आत्महत्या केल्याचा बनाव रचल्याचे निष्पन्न झाले.

मयत योगेश बालाजी जाधव याला मारहाण करून त्याचा खून करून आत्महत्या असल्याचे भासविल्यावरून मयताचा भाऊ सचिन बालाजी जाधव, वय २६ वर्ष व ती ची आई यांच्या विरुद्ध गुरन क्रमांक ०३/२०२४ कलम ३०२, ३२३, १८२, ३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून नमूद आरोपींना ताब्यात घेण्यात आलेले आहे.

औसा पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनात अतिशय कौशल्यपूर्वक तपास करून खून करून आत्महत्या केल्याचा बनाव रचणाऱ्या आरोपींना खुनाच्या गुन्ह्यात अटक केली आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात औसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत लोंढे, पोलीस अमलदार मोतीराम घुले, रामकिसन गुट्टे, दिनेश गवळी, कदम, तूमकुटे , गायकवाड,भंडे, डांगे, महिला पोलीस अमलदार सरवदे यांनी केली आहे.

# मातृभाषा शिक्षणाचे सर्वोत्कृष्ट माध्यम आहे सुप्रसिद्ध कवी नरसिंग इंगळे

लातूर :- मातृभाषा हे शिक्षणाचे सर्वोत्कृष्ट माध्यम आहे त्यामुळे किमान प्राथमिक शिक्षणात तरी मातृभाषेतून शिक्षण अनिवार्य करावे ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य होईल असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी नरसिंग इंगळे यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महाविद्यालयातील एल क्यू ए सी, राष्ट्रीय सेवा योजना, भाषाकुल, मराठी भाषा आणि वाङ्मय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत विशेष कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारपीठावर वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे, मराठी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलनाने आणि स्वागत गीताने या कार्यक्रमाची सुरुवात झाली . पुढे बोलताना कवी नरसिंग इंगळे म्हणाले की, स्वभाषा, स्वराज्य, स्वसंस्कृती याचे संवर्धन करण्याची जबाबदारी त्या त्या भाषिक व्यक्तीची असते. भाषा बदलली की संस्कृती ही बदलत असते कोणतीही भाषा जेव्हा कमी वापरात येते तेव्हा संस्कृतीच्या पतनाला देखील सुरुवात होते. आपण आपले सण, वार, उत्सव, म्हणी, उखाणे लोकपरंपरा, लोकसंस्कृती, लोकउपासक, साहित्य यांचे संवर्धन करावयास हवे भाषा ही आपले आयुष्य आणि भविष्य घडवत असते. मातृभाषेतील साहित्य हा आमच्या अभिमानाचा ठेवा आहे.



मराठी साहित्याने आणि संस्कृतीने आपल्या अंगीभूत गुणधर्मातून विश्वात्मक पातळीवर नावलौकिक कमाविले आहे असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे औचित्य साधून त्यांनी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय कविता, आई, सखी, दर पाच वर्षांनी, शिवार उचकी या कवितांचे बहारदार असे सादरीकरण केले. आपल्या स्वागतपर मनोगतात उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे म्हणाले की, मराठी माणसाच्या आयुष्यात भाषेचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेची तुलना अमृताशी केलेली आहे. माणसाचे आयुष्य सार्थकी करणारी आणि त्याला जगण्याचे परमोच्च आनंद देणारी जर कोणती गोष्ट असेल तर ती मराठी भाषा आहे. तिचे सामर्थ्य वाढविणे आणि विविध अंगी सौंदर्याचा आस्वाद घेणे आणि त्यातून भाषेचे संवर्धन करणे काळाची गरज आहे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले.

आपल्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, समृद्ध भाषेमुळे माणसाची प्रगल्भता, वैचारिकता, तर्कशुद्धता वाढत असते. मराठी भाषा ही विचार, तत्त्वज्ञान, ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान अशा सर्व विचार वाहिन्यांनी आणि ज्ञानाची अभिव्यक्तीचे समर्थ असे माध्यम झाली आहे. मराठी भाषिक व्यक्ती म्हणून आपल्याला भाषेचा सार्थ अभिमान वाटला पाहिजे. मनात येणारे विचार, भावना, तर्क यांना शब्दबद्ध करून सृजनात्मक साहित्य लेखनाकडे विद्यार्थ्यांनी वळले पाहिजे असेही ते म्हणाले. यावेळी अस्मिता या भित्तिपत्रक काव्यविषेकांचे आणि भाषा क्षेत्रातील करिअरच्या संधी या विशेषकांचे विमोचन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. साक्षी घोडके, कु. वैष्णवी फरकांडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार हिंदी विभागप्रमुख डॉ. मनोहर चपळे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. रमेश तडवी, प्रा. व्यंकट दुडीले, प्रा. किसनाथ कुडके, प्रा. मारुती माळी, प्रा. शंकर भोसले, प्रा. शिवगीता तुपकरी, प्रा. उषा ठोंबरे, बालाजी डावकरे, आनंद खोपे, संतोष येंचेवाड, भीमाशंकर सुगरे, सय्यद जलील, धनश्री बंडे, वैष्णवी कस्तुरे, ऋतुजा भिसे, मिताली आगलावे, यादव अवंतिका यांनी परिश्रम घेतले.

# जिप बांधकाम उपविभाग किनवट मधे काम न करताच २ कोटी रुपयांची लावली विल्हेवाट.!

किनवट.ता.प्र./ शेख शौकत :- आदिवासीं बहुल किनवट तालुक्यात विकासाचे मागासलेपण सर्वसामान्य जनतेचा पाचवीलाच पुजलेले आहे.विकास म्हणजे काय असतो हे बघण्यासाठी येथील जनतेला एकतर पश्चिम महाराष्ट्रात नाहीतर शेजारी असलेल्या तेलंगणा राज्यात जावून बघावे लागते. किनवट तालुक्यात बारामती सारखा विकास होईल असे म्हणत म्हणत तेव्हाची पंधरा वर्षे गेली आणि नागपूर सारखा विकास होईल असे बघत बघत चार वर्षे निघून गेली पण शेवटी तो विकास काही आलाच नाही. भ्रष्टाचार आणि राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग किनवट तालुका गोकुंदा सर्कल मधे आदिवासी उपयोजना अंतर्गत मंजूर ग्रामीण मार्ग किनवट ते दरसांगवी चे काम न करताच पैशांची उचल करण्यात आली असून सदरील प्रकरणी चौकशी तक्रारदार समक्ष करत काम न करता पैशे उचल करणाऱ्या




शाखा अभियंता श्रीराम पाटील आणि गुत्तेदार यांचा वर योग्यती निलंबनाची कारवाई करत फोजदरी गुन्हे नोंद करणे बाबत लेखी निवेदन जिल्हा परिषदेचा सीईओ मॅडम यांचा नावाने सादर करण्यात आले आहे. किनवट या आदिवासी तालुक्यातील जीप बांधकाम उपविभाग किनवट सर्कल गोकुंदा अंतर्गत शनिवार पेठ ते दरसांगवी या ग्रामीण मार्गावर आज पर्यंत कोणत्याही योजनेत काम करण्यात आले नव्हते म्हणून त्यावर आदिवासी उपयोजना अंतर्गत दिनांक २६/०४/२०२३ रोजी लिखाशिर्ष ३०५४२७२२ सन २०२२-२३ अंतर्गत काम मंजूर करण्यात आले होते.सदरील कामासाठी शासनाने २ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.परंतु सदरील काम शाखा अभियंता श्रीराम पाटील आणि गुत्तेदार श्रीराम कन्स्ट्रक्शन यांनी संगनमताने काम न करताच पैसे उचल केले आहेत.जी की शासनाची आणि जनतेची पुर्णत फसवणूक करण्यात आलेली आहे. तरी सदरील प्रकरणी आपण व्यक्तिशः लक्ष्य देत सदरील कामाची चौकशी आपल्या मार्गदर्शन खाली तक्रारदार समक्ष करत शासनाची आणि जनतेची फसवणूक करणाऱ्या शाखा अभियंता श्रीराम पाटील आणि गुत्तेदार यांचा वर तात्काळ योग्य ती निलंबनाची आणि फोजदारी स्वरूपाची कार्यवाही करत एजंसीला शासनाचा काळ्या यादीत टाकत शासनाचा झालेल्या नुकसानाची भरपाई यांचा स्थावर व जंगम मालमत्तेची जप्ती करत करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

# नवी मुंबई पोलिस आयुक्तालया अंतर्गत राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२४ प्रारंभ

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक २८- ०१- २४ रोजी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत वाहतूक विभाग तिरूपती काकडे साहेब पोलिस उपायुक्त नवी मुंबई, सुनील बोंडे साहेब सहाय्यक पोलीस आयुक्त नवी मुंबई तसेच श्रीकात धरणे साहेब वरिष्ठ पोलीस निरीक्षक साहेब वाहतूक विभाग तुर्भे यांच्या व आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले व्यसनमुक्ती, रस्ता सुरक्षा अभियान यांच्या सहाय्याने शिव वाहतूक सेवा नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने




रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले यावेळी आयोजक आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले अध्यक्ष शिव वाहतूक सेवा नवी मुंबई, श्री महाजन साहेब पोलिस उपनिरीक्षक तुर्भे वाहतूक विभाग तसेच पोलीस नाईक गोडे, तेलंगे, चौधरी असे नेरूळ रेल्वे स्टेशन सन्मान हॉटेल समोर हुतात्मा बाबू गेनू रिक्षा स्टॅन्ड या ठिकाणी रिक्षा चालक मालक यांची मीटिंग घेण्यात आली सदर मीटिंगमध्ये मालक यांना वाहतुकीचे नियमनाबाबत प्रबोधन करण्यात आले. तसेच प्रामाणिक रिक्षा चालक राम बाबू सिंग याने त्याचे रिक्षातून प्रवास करणाऱ्या एका महिला प्रवासी चे ७० हजार रुपये असलेली पर्स नेरूळ पोलीस स्टेशन येथे जमा करून सदर महिलेला परत देऊन उत्कृष्ट काम केले, त्याबद्दल त्यांना सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास रिक्षा चालक-मालक संघटना, शिव वाहतूक सेवा नवी मुंबई अध्यक्ष श्री दिलीप किसनराव आमले आपला माणूस स्टँड प्रमुख नंदू जाधव, सचिन लाड शधनंजय विश्वासराव, सुनील गाडे, नवनाथ कातकर, संजय दांडगे, सुदाम पोखरकर, प्रणय तुडीलकर सुनील पाटील रामा पाटील इत्यादी पदाधिकारी व सुमारे १०० पेक्षा जास्त रिक्षा चालक उपस्थित होते. यावेळी रस्ता सुरक्षा प्रतिज्ञा शपथ उपस्थित रिक्षा चालकांना श्री दिलीप किसनराव आमले यांनी दिली.

# उल्हसनगर येथील वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर येथील वंचित बहुजन आघाडी मध्ये मोठ्या प्रमाणात बाहेरील कार्यकर्त्यांचा प्रवेश होत आहे . या प्रवेशामुळे ही आघाडी मजबुत होताना दिसत आहे. काल सम्राट अशोक नगर उल्हासनगर ३ येथील धम्मदिप बुध्दविहारात झालेल्या कार्यक्रमात दिनेश पवार व त्यांच्या सहकाऱ्यानी वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश केला असुन यांच्या प्रवेशाने सदर आघाडीमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. उल्हासनगर शहरात वंचित बहुजन आघाडी ही शहर अध्यक्ष उज्वल रतन महाले यांच्या नेतृत्वाखाली चांगली घौडदौड करत आहे . प्रत्येक विभागात ही आघाडी काम करत आहे. तेव्हा काल सम्राट अशोकनगर येथील कार्यकर्ते दिनेश पवार व त्यांचे सहकारी यांनी शहर सचिव निलेश देवडे यांच्या नेतृत्वाखाली वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी शहर महासचिव प्रा. प्रविण माळवे , कोषाध्यक्ष ईश्वरभाऊ सोनवणे, शहर उपाध्यक्ष धनराज मोरे , शहर उपाध्यक्ष तात्या बाविस्कर , शहर प्रसिद्धी प्रमुख संदिप अहिरे , नितिन भालेराव, मनोज जगताप यांनी उपस्थित राहुन कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

# १०४ वर्षांचा नवरदेव, ४९ वर्षांची नवरी

भोपाळ : मध्य प्रदेशमध्ये राहणारे १०४ वर्षीय स्वातंत्र्यसैनिक हबीब नजर साहेब सध्या चर्चेत आले आहेत. त्यांचा एक व्हीडीओ व्हायरल होत आहे, ज्यात दावा केला जातोय की, त्यांनी वयाच्या १०३ व्या वर्षी तिसरे लग्न केले आहे. हा व्हीडीओ चर्चेत येण्याचे कारण म्हणजे, त्यांनी लग्न केलेल्या महिलेचे वय ५० वर्षे आहे. त्यांच्या लग्नाला एक वर्ष होऊन गेले आहे, पण व्हीडीओ आता चर्चेत आला आहे.भोपाळमध्ये राहणारे स्वातंत्र्यसैनिक हबीब नजर उर्फ मंझले मियाँ मध्य प्रदेशातील सर्वात वयस्कर नवरदेव आहेत. त्यांनी गेल्यावर्षी वयाच्या १०३ व्या वर्षी वृद्ध ४९ वर्षीय फिरोज जहाँ यांच्याशी लग्न केले. वयाच्या या टप्प्यावर एकटेपणा दूर करण्यासाठी लग्न केल्याचे हबीब नजर सांगतात. सोशल मीडियावर या अनोख्या लग्नाची जोरदार चर्चा सुरू आहे. त्यांचा एक व्हीडीओदेखील व्हायरल होत आहे,

# एसएसटी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी राबविले राष्ट्रध्वज संकलन अभियान

उल्हासनगर / प्रतिनिधी : दरवर्षी स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन संपूर्ण देशभरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो आणि त्याच वेळेला घरोघरी, गाड्यांवर भारताचा राष्ट्रध्वज नागरिक लावत असतात. परंतु दुसऱ्या दिवशी हे ध्वज रस्त्यांवर पडलेले आढळतात. या राष्ट्रध्वजाला सन्मानाने संकलित करण्याचे कार्य एस एस टी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी नियमितपणे करीत आलेले आहेत. यावर्षी सुद्धा प्रजासत्ताक दिनानंतर दोन दिवस उल्हासनगर मधील विविध महत्त्वाच्या चौकांमधून आणि रस्त्यांवरून पडलेले राष्ट्रध्वज विद्यार्थी स्वयंसेवकांनी संकलित करून राष्ट्रध्वजाला त्याचा सन्मान दिला .हा उपक्रम विद्यार्थ्यांनी एसएसटी महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य डॉ.पुरस्वानी, आयक्यूएसी समन्वयक डॉ. खुशबू पुरस्वानी, राष्ट्रीय सेवा योजनेच्या जिल्हा समन्वयक आणि उपप्राचार्य प्रा. जीवन विचारे यांच्या मार्गदर्शनाखाली केले असुन कार्यक्रम अधिकारी प्रा. मयूर माथूर, प्रा.योगेश पाटील यांच्या सहकार्याने स्वयंसेवकांनी यशस्वीपणे पूर्ण करून शेकडोंच्या संख्येने राष्ट्रध्वज संकलित केले.

# मराठा आरक्षणाच्या अध्यादेशाची ओबीसी बांधवाकडून होळी

लातुर:- मराठवाडयातील मराठयांनी तिवृ आंदोलन केल्यामुळे मराठयांच्या दबावाला बळी पडून शिंदे सरकारने मराठयांना ओबीसी प्रवर्गातुन आरक्षण देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने दि.२६ जानेवारी २०२४ रोजी निर्णय घेऊन अध्यादेश काढला आहे. या अध्यादेशाने मराठ्यांनी ओबीसीचा हक्कावर गदा आणलेला आहे,यामुळे सर्व ओबीसी समाज नाराज होऊन तिव्र निषेध करत रस्त्यावर ऊतरून दि.२९जानेवारी २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे शासनाच्या नावे सर्व ओबीसी कार्यकर्त्याच्या नेत्रत्वात निवेदन देऊन २६ जानेवारीचा अध्यादेश रद्य करण्याची मागणी करण्यात आली.अन्यथा महाराष्ट्र पेटवु ,विरोधात रस्त्यावर उतरू असे निवेदन देण्यात आले. यावेळी कार्यालयाच्या बाहेर येऊन २६ जानेवारीच्या अध्यादेशाची पेटवुन होळी करण्यात आली व शिंदे





सरकारचा निषेध करण्यात आला. यावेळी एड, गोपाळ बुरबुरे, अजित निंबाळकर, भरत काळे,सुदर्शन बोराडे ,अनंत चौधरी, मंजुषा निंबाळकर ,सुनीता कुरुंद, सुमित्रा स्वामी ,सुजाता अजनीक,र अरुणा बंडापल्ले रामराजे आत्राम ,रंगनाथ घोडके ,अपर्णा साखरे रेखा कोलकोंडे, नागनाथ पोदर,एन एम पेंढारकर, प्रशांत काटे ,नागनाथ पोलकर, धोंडे एन एम., स्वप्निल वाघमारे सोनफुले नवलकुले संजय, ज्ञानोबा काळे, हरिभाऊ गायकवाड, राजेश भांडे, मल्लिनाथ पांचाळ ,कारले भागवत, अंकुश पांचाळ, पांडुरंग माळी ,साळुंखे रामदास, पोळकर आनंद ,बाळासाहेब फासेएड, गोपाळ बुरबुरे, अजित निंबाळकर, भरत काळे,सुदर्शन बोराडे ,अनंत चौधरी, मंजुषा निंबाळकर ,सुनीता कुरुंद, सुमित्रा स्वामी ,सुजाता अजनीक,र अरुणा बंडापल्ले रामराजे आत्राम ,रंगनाथ घोडके ,अपर्णा साखरे रेखा कोलकोंडे, नागनाथ पोदर,एन एम पेंढारकर, प्रशांत काटे ,नागनाथ पोलकर, धोंडे एन एम., स्वप्निल वाघमारे सोनफुले नवलकुले संजय, ज्ञानोबा काळे, हरिभाऊ गायकवाड, राजेश भांडे, मल्लिनाथ पांचाळ ,कारले भागवत, अंकुश पांचाळ, पांडुरंग माळी ,साळुंखे रामदास, पोळकर आनंद ,बाळासाहेब फासे आदि उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE